दै(1).मर्डर, 13 ऑगस्ट...

संपादक : राकेश गर्दे • धुळे/नंदुरबार/जळगाव • वर्ष :२० • अंक : ७९ • मंगळवार १३ ऑगस्ट २०१९ • पृष्ठ : ४ • किंमत : ₹ १.०० • email- editor... • website-www.dainikmurder.net

बालाजी CLUB
BUY 2 GET 1 FREE
JEANS | SHIRT | T-SHIRT

दैनिक (Marathi Daily)
# मर्डर
•संस्थापक संपादक राजेंद्र गर्दे
९८२३२६५१११/९९२३१०७७०७

...स फुट वेअर
...स्टेशन के सामने
9323547533

FAKE

# अजब प्रेग्नंसी किटच्या गजब कहाण्या!

## हिरे मेडिकल कॉलेजच्या प्रतापामुळे तरुणींसह विवाहितांच्या आयुष्यात वादळ



**धुळे,• दै.मर्डर न्यूज •**

डॉक्टरांना समाजात देवाचे स्थान आहे. मृत्यूच्या दाढेतून रुग्णांना सहीसलामत बाहेर काढण्याचे ...त्याचे सेवाकार्य डॉक्टर करतात. परंतु, सध्या हिरे मेडिकल कॉलेजमधील रुग्णांना तेथील सेवेचा उलटा आणि ति... भयावह अनुभव येत आहे. सध्या हिरे मेडिकल कॉलेजमध्ये रुग्णांच्या जीवाशी आणि भावनांशी ... असा खेळ खेळला जात आहे. तेथील प्रमुख म्हणून डॉ.मिनाक्षी गजभिये यांनी तेथे होणारे उपचा... वापरात असलेल्या औषधी, विविध प्रकारच्या तपासणी किट यांची तपासणी करण्यावर कटा... लक्ष घालणे क्रमप्राप्त ठरते. कारण, एखादी चुकीची उपचार पध्दती किंवा मुदत बाह्य औषधी, तपास... किटचा वापर झाल्यास पुढील सर्व उपचाराची दिशा भरकटते. यातून रुग्णाचा जीवही जावू शकतो. शिवा..., एखाद्या मुदत ... माध्यमातून झालेली 'टेस्ट' कोणाचे सामाजिक आयुष्यही उध्वस्त ... शकते, असे ... बसणार नाही. परंतु, हिरे मेडिकल कॉलेजमध्ये असे अनेक प्रकार ...ल्याची माहि... मुदतबाह्य तपासणी किटमुळे काही तरुणींच्या व महिलांच्या आयुष्यात मोठा ग...ळ निर्माण झाल्याचे धक्कादायक प्रसंग घडल्याचे वृत्त आहे. या सर्व परिस्थितीला जबाबदार कोण? चूक करणारे की त्यांच्यावर पांघरुन ...ालणारे? की त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारे? असे अनेक प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. यामुळे आता याची वरिष्ठस्तरावर दखल ...ली जावी. दोषींवर कारवाई व्हावी. जेणे करुन कोणाच्याही आयुष्याशी डॉक्टरांना खेळता येणार नाही, एवढीच रास्त अपेक्षा.

शासकीय हिरे मेडिकल कॉलेजमध्ये ढिसाळ कामाचे अनेक नमुने यापूर्वी... समोर आले आहेत. अधिष्ठाता डॉ.मिनाक्षी गजभिये यांच्या अधिपत्याखाली चालणाऱ्या या मेडिकल कॉलेजमध्ये औषध खरेदीतही मोठा भ्रष्टा...र झाल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. त्याचाच एक भाग म्हणून की काय, नुकत्याच एक्सपायरी डेट उलटून गेलेल्या प्रेग्नंसी टेस्ट की... दैनिक मर्डरच्या हाती लागल्या आहेत. या कीटच्या उत्पादनाची तारीख एप्रिल २०१७ अशी असून एक्सपायरी एप्रिल २०१९ आहे. ॲक्युरेट नाव... वापरात येत असतांना त्याची खबर अधिष्ठाताना कशी नाही याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आ... दरम्यान या ... जबरदस्त मानसिक धक्का बसला आहे.

FAKE PHOTOSHOP IMAGE




### प्रसंग दुसरा

...दहा वर्ष उलटूनही घरात पाळणा हाललेला नाही. म्हणून का...टिकेची धनी ठरलेली विवाहिता मानसिक तणावात असते. एका दिवशी ...तील तांत्रिक बिघाडामुळे तिची मासिक धर्म बंद होतो. ...मुळे ती आन...त होते. म्हणून डॉक्टरकडे जाते. हिरे मेडिकल ...मधील डॉक्... तिला तपासतात. व तिला तपासणीसाठी प्रेग्नंसी ...दिला जातो. ... ती विवा... या किटच्या सहाय्याने तपासणी करते अन् तिच्या आयुष्यात आंनदा... उधाण येते. कारण तिची प्रग्नंसी टेस्ट पॉझिटिव्ह आलेली असते. कुटु...ल आणि सासरीही खूप आनंदाचे ... यामुळे पुन्हा खात्री करण्यासाठी बाहेर... प्रेग्नंसी किटच्या सहाय्याने ती पुन्हा तपासणी करते अन् धक्कादायक रिपोर्ट येतो. अनेक वर्षांनंतर मातृत्वाला सामोरे जाणाऱ्या त्या विवाहितेवर ...नू आभाळच कोसळते. सासरीही तलकी वातावरण निर्माण होते. का...ण नवीन कीटवर त्या विवाहितेची ... टेस्ट निगेटि... आलेली असते. पुन्हा याठिकाणी प्रेग्नंसी टेस्ट ...च्या एक्सपायरी डेटचा मुद्दा पुढे येतो आणि पुढचा गुंता लक्षात येतो.

### प्रसंग तिसरा

नुकतेच जेम-तेम एक महिन्यांपूर्वी ग्रामीण भागातील एका तरु...चा विवाह झालेला. ती पतीराजासोबत पुढील संसाराचे स्वप्न रंगवण्यात गुंग असते. काहीतरी खाण्यात आल्याने अचानक तिला उलट्या होतात. यामुळे पतीला संशय येतो. तो तिला उपचारासाठी हिरे मेडिकल कॉलेजमध्ये आणतो. डोक्यात संशयाचे भूत असल्याने पती तिची प्रेग्नंसी टेस्ट करण्याचा आग्रह धरतो. तेथील किटच्या सहाय्याने झालेल्या तपासणी रिपोर्टमध्ये विवाहितेसह पतीला ती गरोदर असल्याची बातमी कळते. यामुळे तिच्या जीवनात वादळ निर्माण होते. सासरच्यांकडून तिला माहेरी पाठविले जाते. पतीकडून तिला प्रतिसाद मिळत नाही. परंतु, नवविवाहित तरुणी ही तिच्या चारित्र्य संपन्नतेवर ठाम असते. मी जीवनात कुठलेही चुकीचे काम केलेले नाही, असा तिचा ठाम दावा असतो. यामुळे माहेरचे लोक तिची बाहेरच्या मेडिकलमधून आणलेल्या प्रेग्नंसी किटद्वारे तपासणी करतात आणि सर्वांनाच आनंद होतो. कारण, त्या नवविवाहित तरुणीची प्रेग्नंसी रिपोर्ट हा निगेटिव्ह येतो. तिच्या पतीसह सासरच्याही डोक्याचे संशयाचे भूत नाहीसे होते. परंतु एक्सपायरी झालेल्या प्रेग्नंसी टेस्ट कीटमुळे या तरुणीच्या आयुष्यात आलेल्या वाईट प्रसंगामुळे ते हिरे मेडिकल कॉलेजप्रशासनाला दोष देत प्रकरणावर पडदा टाकतात.

### प्रसंग पहिला

नुकतीच वयात आलेली मुलगी.. पोटात दुखत म्हणून हिरे मेडिकल कॉलेजमध्ये उपचारासाठी गेलेली. घरचे ...के अशिक्षित.. डॉक्टरांना शंका म्हणून तिला प्रेग्नंसी टेस्ट कीट दिली जाते. ती मुलगी प्रेग्नंसी टेस्ट कीटवर टेस्ट करते.. रिपोर्ट पॉझिटिव्ह येतो. अन् मुलीच्या ...यात वादळ येते. घरचे सगळेच जुन्या धुरसटल्या विचारांचे असल्याने मुलीने घोर पाप केलंय या नजरेने तिच्याकडे पाहिले जाते. तिच्या आयुष्यात तिने न केलेल्या चुकीबद्दल तिला टोमणे ऐकले जातात. परंतु सगळा घोळ हा एक्सपायरी किटमुळे घडलाय याबाबत मात्र घरातील कुणालाच शंका नसते. कुटुंबातील एक शिक्षित महिला बाहेरच्या किटवर पुन्हा तपासणी करण्याचा सल्ला देते. अन्य दुकानातून प्रेग्नंसी किट मागविली जाते. त्याद्वारे तपासणी होते तेव्हा तिचा रिपोर्ट निगेटिव्ह येतो. याचा शोध घेतला असता हिरे मेडिकल कॉलेजमधल्या प्रेग्नंसी किटच्या एक्सपायरी डेटचा मुद्दा पुढे येतो तेव्हा त्या मुलीचे आयुष्य पुन्हा सुरळीत होते आणि घरचेही तणावमुक्त होतात.

संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियानाअंतर्गत धुळे जिल्ह्यात
बोरकुंड ग्रामपंचायत प्रथम
लोकनियुक्त सरपंच श्री बाळासाहेब भदाणे यांच्या विकासाभिमुख प्रयत्नांना यश

“अजब प्रेग्नंसी किटच्या गजब कहाण्या”, हिरे मेडिकल कॉलेजच्या प्रतापामुळे तरुणींसह विवाहितांच्या आयुष्यात वादळ संबधी नुकतेच एका स्थानिक वृत्तपत्राने प्रशासनाकडून कोणतीही शहानिशा न करताच निव्वळ जनतेची दिशाभूल करणेसाठी चुकीची बातमी प्रसिध्द केलेली आहे.

सदर बातमीनुसार कालबाहय (एक्सपायरी) झालेल्या प्रेग्नंसी किटसचा वापर श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात केल्याचा आरोप करण्यांत आलेला आहे. परंतु याठिकाणी अशी कोणत्याही प्रकारची कालबाहय औषधी/शल्यवस्तु/किटस वापरण्यांत येत नाहीत. याची संपूर्णतः पडताळणी केली असता असे निदर्शनास आले की, सदर बातमीमध्ये जो प्रिग्नंसी किटसचा फोटो छापून आलेला आहे, त्यावर फोटोशॉपी या तंत्रज्ञानाने मोठया चलाखीने बॅच नंबर हा खोडलेला आढळून येत आहे. व अशा प्रकारची कालबाहय (एक्सपायरी झालेली) किट या सर्वोपचार रुग्णालयात वापरलीच जात नाही. वर्तमानपत्रात छापून आलेला किटसचा फोटो हा दुसरा कुठलातरी टाकून या संस्थेची नाहक बदनामी केल्याचे यावरुन स्पष्टपणे दिसून येते.खोडखाड करुन फोटोशॉपी केल्यामुळे हे षडयंत्र असावे अशी दाट शक्यता आहे.

तरी वर्तमापनत्रात छापून आलेली बातमी पूर्णतः चुकीची व निराधार आहे.